**महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....**

# महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

**शासन निर्णय क्र. स्वयंअ-२०१३/(८५/१३)/माशि १**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-४०० ०३२.

दिनांक :- १५ जून, २०१३

वाचा :-

१) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक १ दिनांक ०४ जानेवारी, २०१३

२) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक ६ दिनांक १९ जानेवारी, २०१३

३) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक प्राशातु - १११२ / (२५८/२०१२) / प्राशि - ३, दिनांक १३ फेब्रुवारी, २०१३

४) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक ५ दिनांक २२ फेब्रुवारी, २०१३

५) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक ५७, ५८ व ५९ दिनांक २० एप्रिल, २०१३

६) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक नाहप्र २००९ / (६६३/०९) / माशि - १, दिनांक २० जून, २०१२

प्रस्तावना -

राज्यातील सर्व शाळांना बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ लागू करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने राज्यामध्ये सर्व नवीन

खाजगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना मान्यता देताना हेतुपत्र (Letter of Intent) व शाळा मान्यता प्रमाणपत्र (Letter Of Approval) ची पध्दती स्वीकारावी असा धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने CBSE, ICSE इत्यादी बोर्डांच्या इंग्रजी माध्यमांच्या शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी व ना हरकत प्रमाणपत्र देण्याकरीता शासन निर्णय दिनांक २० जून, २०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये विस्तृत कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे.

२. कायम विना अनुदान तत्वावर नवीन खाजगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना मान्यता देणे व विद्यमान शाळांचा दर्जावाढ करणे यासाठी शासनाने सन २०१३ मध्ये महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ पारित केला असून त्याची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून करण्यात आलेली आहे. या अधिनियमाच्या अनुषंगाने फेब्रुवारी, २०१३ मध्ये अर्ज मागविण्यात आले होते. प्राप्त ७,१०८ अर्जाची छाननी करुन दिनांक १५ मे, २०१३ रोजी २,४१७ अर्जांना पात्र करण्यात आलेले आहे. या पात्र प्रस्तावावर पुढील कार्यवाही कोणत्या पध्दतीने करावी ही बाब शासनाच्या विचाराधीन होती. सर्व बाबींचा विचार करुन शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

## शासन निर्णय -

(१) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अन्वये सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरीता प्राप्त झालेल्या एकूण ७१०८ प्रस्तावांपैकी पुढीलप्रमाणे २४१७ प्रस्ताव पात्र म्हणून जाहीर करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | वर्गीकरण | एकूण प्राप्त प्रस्ताव | पात्र प्रस्ताव | अपात्र प्रस्ताव |
|---|---|---|---|---|
| १ | नवीन शाळा मान्यतेचे प्रस्ताव | ६,१२१ | १,९७७ | ४,१४४ |
| २ | शाळा दर्जावाढीचे प्रस्ताव | ९८७ | ४४० | ५४७ |
| | एकूण | ७,१०८ | २,४१७ | ४,६९१ |

(२) **शाळा दर्जावाढीच्या** ४४० पात्र शाळांना शैक्षणिक वर्ष २०१३-१४ या वर्षापासून वर्ग सुरु करण्याबाबतची **परवानगी** देण्यात येत आहे.

(३) **नवीन शाळांचे प्रस्ताव** - वरीलप्रमाणे पात्र ठरलेल्या १९७७ नवीन शाळांना याद्वारे परवानगी देण्यात येत आहे. प्रत्येक शाळेने **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९** मधील तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे उपरोक्त संबधित पात्र ठरलेल्या शाळांच्या व्यवस्थापनांनी **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९** मधील तरतुदींची पुर्तता करुन शाळा प्रथम मान्यतेसाठी संबंधित सक्षम अधिका-यांकडे एक महिन्याच्या कालावधीत अर्ज करावेत. संबंधित सक्षम अधिका-यांनी **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९** मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

(४) पूर्व प्राथमिक शाळांना स्वतंत्र शाळा म्हणून मंजूरी देण्यात आलेली नसून त्या प्राथमिक शाळेला संलग्न म्हणून मंजूर करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार या अंतर्गत सुरु होणा-या शाळांना इयत्ता १ली पासून परवानगी देण्यात येईल.

(५) संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल. या अधिनियमामधील तरतुदीनुसार शाळा स्थापन करण्यास किंवा तिचा दर्जावाढ करण्याकरीता दिलेली परवानगी ही ज्या शैक्षणिक वर्षाकरीता देण्यात आलेली असेल त्या शैक्षणिक वर्षाकरीता असेल आणि अशी परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.

(६) सोबतच्या विवरणपत्रात परवानगी देण्यात आलेल्या नवीन / दर्जावाढ शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील त्याचप्रमाणे महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ यातील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

(७) सोबतच्या विवरणपत्रामध्ये दर्शविलेल्या जिल्हानिहाय तपशीलानुसार नवीन शाळा स्थापन करण्यास किंवा विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यास अपात्र ठरलेल्या प्रस्तावांच्या तपशीलासह संबंधित जिल्ह्याच्या छाननी समितीच्या सदस्य सचिवांकडून संबंधित अर्जदाराला वैयक्तिरित्या कळविणे आवश्यक राहील व त्याची पोच शासन दप्तरी ठेवण्यात यावी.

(८) सोबतच्या विवरपत्रात परवानगी देण्यात आलेल्या नवीन / दर्जावाढ शाळांबाबत जिल्हानिहाय DISE Data मध्ये माहिती भरताना, स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद / क्रमांक घेणे आवश्यक राहील. याबातची पुढील कार्यवाही राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्यामार्फत करण्यात यावी. त्याचप्रमाणे सर्व संबंधितांच्या माहितीकरीता शाळेबाहेर स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन / दर्जावाढ प्राप्त शाळा असे जाहीर फलकावर दर्शविणे आवश्यक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in. या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. 201306151740421921-असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(प्रकाश ठुबे)
सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
शिक्षण संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

| अनु. क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थाचे नाव | प्रस्तावित शाळेचे नाव व पत्ता | माध्यम | नवीन शाळा / दर्जा वाढ | छाननी समितीची शिफारस व त्या बाबत प्राप्त झालेल्या हरकती / सूचना / आक्षेप विचारात घेता शासनाचा अंतिम निर्णय | शाळे प्रक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| ७११ | पुणे | मिरा एज्युकेशन ट्रस्ट, अंधेरी वेस्ट, मुंबई-५३ | ट्री हाऊस हायस्कूल, १२ दुधानेनगर, कर्वेनगर, पुणे-५२ | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमि |
| ७१२ | पुणे | कै. इश्वरदास बेहल चॅरिटेबल ट्रस्ट, संत तुकाराम नगर, पिंपरी, पुणे | बेकॉन हायस्कूल, संत तुकाराम नगर, पिंपरी, पुणे | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमि |
| ७१३ | पुणे | अप्पा भानसे शिक्षण संस्था, तळवडे, पुणे | न्यू एंजल्स इंग्लिश स्कूल, तळवडे, ता.हवेली | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमि |
| ७१४ | पुणे | श्री दत्तकृपा शैक्ष. व कृषी ग्राम विकास प्रतिष्ठाण घारगाव ता. श्रीगोंदा जि. अहमदनगर | श्री. आनंदराव जगताप इंग्लिश मेडियम स्कुल, मांडवगण फराटा ता. शिरुर जि.पुणे | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमि |
| ७१५ | पुणे | स्वामी विवेकानंद ग्रामविकास प्रतिष्ठान ता. शिरुर जि.पुणे. | स्वामी विवेकानंद इंग्लिश मेडियम स्कुल मांडवगण फराटा ता. शिरुर जि.पुणे. | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमि |
| ७१६ | पुणे | रावसाहेब दादा पवार घोडगंगा सह.साखर का.मर्या.न्हावरा ता. शिरुर जि.पुणे. | रावसाहेब दादा पवार इंग्लिश मेडियम प्रायमरी स्कुल न्हावरे ता. शिरुर जि.पुणे. (सी.बी.एस.ई.) | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमि |
| ७१७ | पुणे | राजे प्रतिष्ठान सुपे ता. बारमती जि.पुणे. | न्यु इंग्लिश स्कुल चांदगुडेवाडी सुपे ता. बारामती जि.पुणे. | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमि |
| ७१८ | पुणे | एम.सी.ई. सोसायटी, आझम कॅम्पस, पुणे | हाजी अब्दुल कादर मेमन इंग्लिश मिडीयम स्कूल, संतोषनगर, कात्रज,पुणे-४६ | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमि |
| ७१९ | पुणे | सूर्यदत्ता एज्यूकेशन फाऊंडेशन, विजयानगर कॉलनी, सदाशिव पेठ, पुणे | सूर्यदत्ता नॅशनल स्कूल, पाटील नगर, बावधन, खुर्द, | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमि |
| ७२० | पुणे | भामचंद्र शिक्षण प्रसारक मंडळ, भांबोली ता. खेड जि.पुणे. | भामचंद्र इंग्लिश मेडियम ता. खेड जि.पुणे | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ७२१ | पुणे | दिव्यज्योती एज्युकेशन सोसायटी देवाची ऊरुळी ता. हवेली जिपुणे. | के बाजारे इंग्लिश मेडियम स्कुल, देवाची ऊरुळी ता. हवेली जिपुणे. | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ७२२ | पुणे | वेदविज्ञान महाविद्यापिठ बेंगलूर | श्री श्री ज्ञानमंदिर देवाची जाळी ता. जुन्नर जि.पुणे. | मराठी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ७२३ | पुणे | पी.ए.इनामदार एज्युकेशन ट्रस्ट पुणे | लेडी ताहेरुन्निसा इनामदार इंग्लिश मेडियम स्कुल, वडगाव शेरी ता. हवेली जि.पुणे. | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ७२४ | पुणे | वेदविज्ञान महाविद्यापिठ बेंगलूर | श्री श्री ज्ञानमंदिर चिंबळी ता. खेड जि.पुणे. | मराठी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |

VSNITP

महाराष्ट्र शासन

विवरणपत्र

## महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, 2012 अंतर्गत कलम 7 (1) अन्वये नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी सन 2013-14 या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी दिलेल्या अथवा नाकारलेल्या शाळांच्या नावाची यादी

| अ. | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नांव | प्रस्तावीत ठिकाण / शाळेचे नाव व पत्ता | माध्यम | नवीन शाळा /दर्जा वाढ | छाननी समितीच्या प्राथमिक अहवालानुसार पात्र/ अपात्र | छाननी समितीच्या अहवालानुसार अपात्रतेची कारणे | अर्जदार संस्थेची प्राप्त हरकत / सुचना / आक्षेप | छाननी समितीची शिफारस व त्या बाबत प्राप्त झालेल्या हरकती / सूचना / आक्षेप विचारात घेता शासनाचा निर्णय | अपात्रते बाबतची कारणे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| १ | मुंबई (उत्तर) | घाटकोपर शिक्षण प्रसारक मंडळ, पंतनगर, घाटकोपर (पू) मुंबई ७५. | ऋषीकुल विदयालय, पंतनगर, घाटकोपर (पू), मुंबई ७५ | इंग्रजी (S.S.C) | नवीन शाळा इ. १ ते ४ | पात्र | | संस्थेचा प्रस्ताव इ. १ ली ते १० असा सादर केलेला आहे. मात्र वेबसाइटवर इयत्ता १ ली ते ४ थी दर्शविण्यात आलेले आहे करया बदल करुन मिळावा असे दिनांक ०४.०३.२०१३ पत्राने कळविले आहे. | पात्र | |
| २ | मुंबई (उत्तर) | शहिद अब्दुल हमित एज्युकेशन ट्रस्ट, प्लॉट न. २३ के शिवाजी नगर, गोवंडी | अलफरहत उर्दू प्राथमिक शाळा, प्लॉट नं. २९, अजमेरी मस्जिद रोड नं ५ शिवाजी नगर, गोवंडी, मुंबई ४३. | उर्दू | नवीन शाळा इ. १ ते ७ | अपात्र | निर्धारित रकमेची राष्ट्रीयकृत बँकेत मुदत ठेव नाही, अथवा प्रमाणपत्र नाही, जागेचा तपशिल उपलब्ध नाही. बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ नुसार सुविधा उपलब्ध नाही. | आक्षेप/हरकत/सुचना सादर केली नाही. | अपात्र | १) छाननी समितीची शिफारस नाही. २) संस्थेने छाननी समितीच्या अहवालावर हरकत घेतलेली नाही. |
| ३ | मुंबई (उत्तर) | शहीद अब्दुल हमीद एज्युकेशन ट्रस्ट प्लॉट नं २३ के. कोकणी मस्जिद शिवाजीनगर गोवंडी. मुंबई ४३. | महात्मा गांधी मेमोरियल हायस्कूल, पी. एम. जी. पी. कॉलनी मानखुर्द (प), मुंबई ४०० ०४३. | इंग्रजी (S.S.C) | नवीन शाळा इ. १ ते ७ | अपात्र | निर्धारित रक्कमेची राष्ट्रीयकृत बँकेत मुदत ठेव नाही, अथवा प्रमाणपत्र नाही, संस्थेकडे मालकीची अथवा भाडयाची अर्धा एकर जागा उपलब्ध नाही. संस्थेची १६२६ चौ. फु. जागा उपलब्ध असून सदर ठिकाणी महात्मा गांधी मोमोरियल हायस्कूल, इंग्रजी माध्यमाचे इ. ८ वी ते १० वी चे वर्ग कायम विना अनुदान तत्वावर सुरु आहे. त्याच ठिकाणी इ. ८ वी ते १० वी हिंदी माध्यमाचे विनाअनुदानित तत्वावर वर्ग सुरु आहेत. | आक्षेप/हरकत/सुचना सादर केली नाही. | अपात्र | १) छाननी समितीची शिफारस नाही. २) संस्थेने छाननी समितीच्या अहवालावर हरकत घेतलेली नाही. |
| ४ | मुंबई (उत्तर) | शहीद अब्दुल हमीद एज्युकेशन ट्रस्ट प्लॉट नं २३ के. कोकणी मस्जिद शिवाजीनगर गोवंडी, मुंबई ४३. | महात्मा गांधी मेमोरियल हायस्कूल. पी. एम. जी. पी. कॉलनी मानखुर्द (प), मुंबई ४०० ०४३. | हिंदी | नवीन शाळा इ. १ ते ७ | अपात्र | निर्धारित रक्कमेची राष्ट्रीयकृत बँकेत मुदत ठेव नाही, अथवा प्रमाणपत्र नाही, संस्थेकडे मालकीची अथवा भाडयाची अर्धा एकर जागा उपलब्ध नाही. संस्थेची १६२६ चौ. फु. जागा उपलब्ध असून सदर ठिकाणी महात्मा गांधी मोमोरियल हायस्कूल, हिंदी माध्यमाचे इ. ८ वी ते १० वी चे वर्ग विना अनुदान तत्वावर सुरु आहे. त्याच ठिकाणी इ. ८ वी ते १० वीइंग्रजीमाध्यमाचेकायमविनाअनुदानित तत्वावर वर्ग सुरु आहेत. | आक्षेप/हरकत/सुचना सादर केली नाही. | अपात्र | १) छाननी समितीची शिफारस नाही. २) संस्थेने छाननी समितीच्या अहवालावर हरकत घेतलेली नाही. |
| ५ | मुंबई (उत्तर) | सोमय्या विदयाविहार ट्रस्ट विदयानगरी, घाटकोपर, मुंबई ४०० ०७७. | दि सोमय्या स्कूल विदयाविहार घाटकोपर (पू) | इंग्रजी (CBSE) | C.B.S.E. नवीन शाळा इ. १ ते ४ | पात्र | - | | पात्र | |

Nawle Vkas S. (IT. Programmer)
School Education Dept. Mantralaya Mumbai-32

| अ. | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नांव | प्रस्तावीत ठिकाण / शाळेचे नाव व पत्ता | माध्यम | नवीन शाळा /दर्जा वाढ | छाननी समितीच्या प्राथमिक अहवालानुसार पात्र/ अपात्र | छाननी समितीच्या अहवालानुसार अपात्रतेची कारणे | अर्जदार संस्थेची प्राप्त हरकत / सुचना / आक्षेप | छाननी समितीची शिफारस व त्या बाबत प्राप्त झालेल्या हरकती / सूचना / आक्षेप विचारात घेता शासनाचा निर्णय | अपात्रते बाबतची कारणे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| २२३० | पुणे | ज्ञान संजिवीनी शैक्ष. संस्था पुरंदर ता. पुरंदर जि.पुणे. | किड्स पॅरेडाईज इंग्लिश स्कुल, पिसर्वे ता. पुरंदर जि.पुणे | इंग्रजी | नवीन शाळा | अपात्र | १. संस्थेच्या नावे नोंदणीकृत २ एकर जमिन नाही. २. राष्ट्रीयकृत बँकेत संस्थेच्या नावे कायम ठेव रक्कम रु २ लाख नाही. ३. नोंदणीकृत भाडेपट्टा क | संस्थेच्या नावे ४० आर जागा असल्याबाबतचे खरेदी खत सुची क्र. २ जोडलेले आहे. २. राष्ट्रीयकृत बँकेत संस्थेच्या नावे कायम ठेव पावती दिनांक ०७/०५/२०१३ ची जोडलेली आहे. | अपात्र | छाननी समितीची शिफारस नाही. |
| २२३१ | पुणे | ज्ञान संजिवीनी शैक्ष. संस्था पुरंदर ता. पुरंदर जि.पुणे. | सरस्वती इंग्लिश स्कुल, जेजुरी ता. पुरंदर जि.पुणे | इंग्रजी | नवीन शाळा | अपात्र | १. भाडेपट्टा करार १५ वर्षांचा आहे. उपनिबंधकाकडे नोंदणीकृत नाही. | संस्थेच्या नावे ४० आर जागा असल्याबाबतचे खरेदी खत सूची क्र. २ जोडलेले आहे. २. राष्ट्रीयकृत बँकेत संस्थेच्या नावे कायम ठेव पावती दिनांक ०७/०५/२०१३ ची जोडलेली आहे. | अपात्र | छाननी समितीची शिफारस नाही. |
| २२३२ | पुणे | जीवनज्योत शिक्षण प्रसारक मंडळ, जेजुरी ता. पुरंदर जि.पुणे. | जीवन ज्योत इंग्लिश मिडियम स्कुल वाल्हे ता.पुरंदर जि.पुणे. | इंग्रजी | नवीन शाळा | अपात्र | १. संस्थेच्या नावे नोंदणीकृत २ एकर जमिन नाही. २. नोंदणीकृत भाडेपट्टा करार नाही. | शाळा मान्यता मिळाल्यानंतर नोंदणीकृत भाडेपट्टा कराराची पुतंता करु अशा अशयाचे हमिपत्र. | अपात्र | छाननी समितीची शिफारस नाही. |
| २२३३ | पुणे | श्री धर्मवीर शंभुराजे शिक्षण प्रसरक मंडळ ता. शिरुर जि.पुणे | शंभुराजे इंग्लिश मेडियम स्कुल वढु बु ता. शिरुर जि.पुणे. | इंग्रजी | नवीन शाळा | अपात्र | १. संस्थेच्या नावे नोंदणीकृत निकषाप्रमाणे जमिन नाही. २. नोंदणीकृत भाडेपट्टा ३० वर्षांचा नाही. ३. राष्ट्रीयकृत बँकेत संस्थेच्या नावे विहित केलेली कायम ठेव नाही. ४. लेखा परिक्षण अहवाल नाही. | हरकत / सुचना/ आक्षेप नोंदविलेली नाही. | अपात्र | १) छाननी समितीची शिफारस नाही. २) संस्थेने छाननी समितीच्या अहवालावर हरकत घेतलेली नाही. |
| २२३४ | पुणे | व्यंकटेश कृपा सुगर मिल्स लि. ता. शिरुर जि.पुणे | व्यंकटेश कृपा इंग्लिश मेडियमस स्कुल, जातेगाव ता. शिरुर जि.पुणे (राज्य मंडळ) | इंग्रजी | नवीन शाळा | अपात्र | १. संस्थेच्या नावे नोंदणीकृत निकषाप्रमाणे जमिन नाही. २. नोंदणीकृत भाडेपट्टा ३० वर्षांचा नाही. | संस्थेच्या नावे जमिन असलेला गट क्र. २३७ चा ७/१२ जोडलेला आहे. | पात्र | |
| २२३५ | पुणे | स्वामी विवेकानंद ग्राम विकास प्रतिष्ठाण ता. शिरुर जि.पुणे. | स्वामी विवेकानंद इंग्लिश मेडियम स्कुल, मांडवगण फराटा ता. शिरुर जि.पुणे. | इंग्रजी | नवीन शाळा | अपात्र | १. संस्थेच्या नावे नोंदणीकृत निकषाप्रमाणे जमिन नाही. २. नोंदणीकृत भाडेपट्टा ३० वर्षांचा नाही. ३. राष्ट्रीयकृत बँकेत संस्थेच्या नावे विहित केलेली कायम ठेव नाही. | हरकत / सुचना/ आक्षेप नोंदविलेली नाही. | अपात्र | १) छाननी समितीची शिफारस नाही. २) संस्थेने छाननी समितीच्या अहवालावर हरकत घेतलेली नाही. |
| २२३६ | पुणे | स्वामी विवेकानंद ग्राम विकास प्रतिष्ठाण ता. शिरुर जि.पुणे. | स्वामी विवेकानंद इंग्लिश मेडियम स्कुल, शिरसगाव काटा ता. शिरुर जि.पुणे. (सी.बी.एस.ई.) | इंग्रजी | नवीन शाळा | अपात्र | १. संस्थेच्या नावे नोंदणीकृत निकषाप्रमाणे जमिन नाही. २. नोंदणीकृत भाडेपट्टा ३० वर्षांचा नाही. ३. राष्ट्रीयकृत बँकेत संस्थेच्या नावे विहित केलेली कायम ठेव नाही. | हरकत / सुचना/ आक्षेप नोंदविलेली नाही. | अपात्र | १) छाननी समितीची शिफारस नाही. २) संस्थेने छाननी समितीच्या अहवालावर हरकत घेतलेली नाही. |
| २२३७ | पुणे | श्री युगंधर शिक्षण संस्था मलठन ता. शिरुर जि.पुणे, | अनुसया ग्लोबल स्कुल मलठन ता. शिरुर जि.पुणे. | इंग्रजी | नवीन शाळा | अपात्र | १. संस्थेच्या नावे नोंदणीकृत निकषाप्रमाणे जमिन नाही. २. नोंदणीकृत भाडेपट्टा ३० वर्षांचा नाही. (३ वर्षांचा आहे.) ३. लेखा परिक्षण अहवाल नाही. | हरकत / सुचना/ आक्षेप नोंदविलेली नाही. | अपात्र | १) छाननी समितीची शिफारस नाही. २) संस्थेने छाननी समितीच्या अहवालावर हरकत घेतलेली नाही. |
| २२३८ | पुणे | संस्कार शिक्षण संस्था देवदैठण ता. श्रीगोंदा जि. अहमदनगर | संस्कार पब्लिक स्कुल शिरुर ता. शिरुर जि.पुणे. | इंग्रजी | नवीन शाळा | अपात्र | १. संस्थेच्या नावे नोंदणीकृत निकषाप्रमाणे जमिन नाही. २. नोंदणीकृत भाडेपट्टा ३० वर्षांचा नाही. | हरकत / सुचना/ आक्षेप नोंदविलेली नाही. | अपात्र | १) छाननी समितीची शिफारस नाही. २) संस्थेने छाननी समितीच्या अहवालावर हरकत घेतलेली नाही. |
| २२३९ | पुणे | डी.व्ही. प्रतिष्ठान शिक्रापुर ता. शिरुर जि.पुणे. | गुरुकुल पब्लिक स्कुल शिक्रापुर ता. शिरुर जि.पुणे. | इंग्रजी | नवीन शाळा | अपात्र | १. संस्थेच्या नावे नोंदणीकृत निकषाप्रमाणे जमिन नाही. २. नोंदणीकृत भाडेपट्टा ३० वर्षांचा नाही. | हमीपत्र जोडले आहे. | अपात्र | छाननी समितीची शिफारस नाही. |

| अ. | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नांव | प्रस्तावीत ठिकाण / शाळेचे नाव व पत्ता | माध्यम | नवीन शाळा /दर्जा वाढ | छानती समितीच्या प्राथमिक अहवालानुसार पात्र/ अपात्र | छाननी समितीच्या अहवालानुसार अपात्रतेची कारणे | अर्जदार संस्थेची प्राप्त हरकत / सुचना / आक्षेप | छाननी समितीची शिफारस व त्या बाबत प्राप्त झालेल्या हरकती / सूचना / आक्षेप विचारात घेता शासनाचा निर्णय | अपात्रते बाबतची कारणे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| २३१४ | पुणे | रयत शिक्षण संस्था, सातारा | सक्षम इंग्लिश मिडीयम स्कूल, बेल्हे, ता.जुन्नर, जि.पुणे | इंग्रजी | नवीन शाळा | अपात्र | १. राष्ट्रीयकृत बँकेत संस्थेच्या नावे विहित केलेली कायम ठेव नाही. | हरकत / सूचना/ आक्षेप नोंदविलेली नाही. | अपात्र | १) छाननी समितीची शिफारस नाही.<br>२) संस्थेने छाननी समितीच्या अहवालावर हरकत घेतलेली नाही. |
| २३१५ | पुणे | सिता-रंग चॅरिटेबल सोसायटी, बोरी बुद्रुक, ता.जुन्नर | स्व. संजय शांताराम शिंदे इंग्लिश मिडीयम स्कूल, बोरी बुद्रुक, ता.जुन्नर | इंग्रजी | नवीन शाळा | अपात्र | १. संस्थेच्या नावे नोंदणीकृत निकषाप्रमाणे जमिन नाही.<br>२. नोंदणीकृत भाडेपट्टा ३० वर्षांचा नाही. | भाडेपट्टा नोजराईज्ड जोडलेला आहे. | अपात्र | १) छाननी समितीची शिफारस नाही.<br>२) संस्थेने छाननी समितीच्या अहवालावर हरकत घेतलेली नाही. |
| २३१६ | पुणे | अंब्रेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ, बरुळा, ता.औंढा नागनाथ, जि.हिंगोली | सनराईज इंग्लिश मिडीयम स्कूल, भुकूम, ता.मुळशी, जि.पुणे | इंग्रजी | नवीन शाळा | अपात्र | १. संस्थेच्या नावे नोंदणीकृत २ एकर जमिन नाही.<br>२. नोंदणीकृत भाडेपट्टा करार नाही. | हरकत / सूचना/ आक्षेप नोंदविलेली नाही. | अपात्र | १) छाननी समितीची शिफारस नाही.<br>२) संस्थेने छाननी समितीच्या अहवालावर हरकत घेतलेली नाही. |
| २३१७ | पुणे | श्री दत्तकृपा शैक्ष. व कृषी ग्राम विकास प्रतिष्ठाण घारगाव ता. श्रीगोंदा जि. अहमदनगर | श्री. आनंदराव जगताप इंग्लिश मेडियम स्कुल, मांडवगण फराटा ता. शिरुर जि.पुणे | इंग्रजी | नवीन शाळा | अपात्र | भौतिक सुविधा तयार नाहीत. | **हरकत / सूचना/ आक्षेप नोंदविलेली नाही.** | पात्र | |
| २३१८ | पुणे | श्रीनिवास ग्राम विकास मंडळ आलेगाव पागा ता. शिरुर जि.पुणे. | अनिल दादा मधुकर कांबळे इंग्लिश मेडियम स्कुल आलेगाव पागा ता.शिरुर जि.पुणे. | इंग्रजी | नवीन शाळा | अपात्र | १. संस्थेच्या नावे नोंदणीकृत निकषाप्रमाणे जमिन नाही.<br>२. नोंदणीकृत भाडेपट्टा ३० वर्षांचा नाही.<br>३. राष्ट्रीयकृत बँकेत संस्थेच्या नावे विहित केलेली कायम ठेव नाही. | हरकत / सूचना/ आक्षेप नोंदविलेली नाही. | अपात्र | १) छाननी समितीची शिफारस नाही.<br>२) संस्थेने छाननी समितीच्या अहवालावर हरकत घेतलेली नाही. |
| २३१९ | पुणे | स्वामी विवेकानंद ग्रामविकास प्रतिष्ठान ता. शिरुर जि.पुणे. | स्वामी विवेकानंद इंग्लिश मेडियम स्कुल मांडवगण फराटा ता. शिरुर जि.पुणे. | इंग्रजी | नवीन शाळा | अपात्र | मुदत ठेव १५/०३/२०१३ नंतर ठेवलेली आहे. | राष्ट्रीयकृत बँकेत संस्थेच्या नावे विहित केलेली कायम ठेव आहे. | पात्र | |
| २३२० | पुणे | रावसाहेब दादा पवार घोडगंगा सह.साखर का.मर्या.न्हावरा ता. शिरुर जि.पुणे. | रावसाहेब दादा पवार इंग्लिश मेडियम प्रायमरी स्कुल न्हावरे ता. शिरुर जि.पुणे. (सी.बी.एस.ई.) | इंग्रजी | नवीन शाळा | अपात्र | लेखा परिक्षण अहवाल नाही. | लेखा परिक्षण अहवाल जोडलेला आहे. | पात्र | |
| २३२१ | पुणे | स्वामी विवेकानंद फाऊंडेशन नगर रोड ता. शिरुर जि.पुणे. | सेंट कृष्णा इंग्लिश मेडियम स्कुल शिक्रापुर ता. शिरुर जि.पुणे | इंग्रजी | नवीन शाळा | अपात्र | १. संस्थेच्या नावे नोंदणीकृत जमिन नाही.<br>२. नोंदणीकृत भाडेकरार नाही. | त्रुटींची पुर्तता करणेबाबतचे हमी पत्र. | अपात्र | छाननी समितीची शिफारस नाही. |
| २३२२ | पुणे | ज्ञानराज ज्ञानपीठ शिरुर ता. शिरुर जि.पुणे | ज्ञानराज सिटी स्कुल २४ वा मैल शिक्रापुर ता. हवेली जि.पुणे. | इंग्रजी | नवीन शाळा | अपात्र | १. संस्थेच्या नावे नोंदणीकृत निकषाप्रमाणे जमिन नाही.<br>२. नोंदणीकृत भाडेपट्टा ३० वर्षांचा नाही.<br>३. अनुसुची क मध्ये माहिती सादर करणेत आलेली नाही. | हरकत / सूचना/ आक्षेप नोंदविलेली नाही. | अपात्र | १) छाननी समितीची शिफारस नाही.<br>२) संस्थेने छाननी समितीच्या अहवालावर हरकत घेतलेली नाही. |
| २३२३ | पुणे | कला प्रसार शिक्षण संस्था भरणेवाडी ता. इंदापूर जि.पुणे. | क्रियेटिव्ह माईडलेस अँकेडमी भरणेवाडी ता. इंदापुर जि.पुणे. | इंग्रजी | नवीन शाळा | अपात्र | १. संस्थेच्या नावे नोंदणीकृत निकषाप्रमाणे जमिन नाही.<br>२. नोंदणीकृत भाडेपट्टा ३० वर्षांचा नाही. | नोटराईज्ड भाडेकरार जोडलेला आहे. | अपात्र | छाननी समितीची शिफारस नाही. |



Tanujaa M.

**Principal**
Raosahebdada Pawar English
Medium School, Raosahebnagar
A/p. Nhavare, Tal. Shirur, Dist. Pune
Udise - 27251205926

रावसाहेबदादा पवार घोडगंगा सह. सा. का. मर्या;
रावसाहेबनगर-न्हावरे, ता. शिरुर, जि. पुणे
आवक नं. २३ दिनांक
17 APR 2017
क्लार्क

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१७/प्र.क्र.१०४/एसएम- २
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: ०७ एप्रिल, २०१७

प्रस्तावना -

१. रावसाहेबदादा पवार घोडगंगा सहकारी साखर कारखाना मर्यादित, रावसाहेबनगर, न्हावरे,ता.शिरुर, जि.पुणे या संस्थेद्वारा संचलीत रावसाहेबदादा पवार इंग्लिश मिडीयम स्कुल, रावसाहेबनगर,न्हावरे,ता.शिरुर,जि.पुणे या शाळेस स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनास सादर झाला होता. सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

२.१ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत रावसाहेबदादा पवार घोडगंगा सहकारी साखर कारखाना मर्यादित, रावसाहेबनगर, न्हावरे,ता.शिरुर, जि.पुणे या संस्थेद्वारा संचलीत रावसाहेबदादा पवार इंग्लिश मिडीयम स्कुल, रावसाहेबनगर,न्हावरे,ता.शिरुर,जि.पुणे या उच्च प्राथमिक ते उच्च माध्यमिक शाळेस (इ. ६ वी ते १२ वी, इंग्रजी माध्यम, राज्य मंडळ) सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून नवीन शाळा सुरू करण्यास खालील अटी व शर्तींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून शासन परवानगी देण्यात येत आहे.

२.२ अटी व शर्ती -

(१) सदर संस्थेने महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियम) अधिनियम २०१२ मधील तरतुदीनुसार संस्था नोंदणी प्रमाणपत्र तीन महिन्यात विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे यांच्याकडे सादर करणे आवश्यक आहे.

(२) शाळेने **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.**

(३) संबधित शाळेच्या व्यवस्थापनाने **अधिनियम, २००९** मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे:-

अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून

एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

ब) व्यवस्थापनास सन २०१७-१८ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले असल्यास शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून **अठरा महिन्याच्या** आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच **रद्दबातल** ठरेल.

(४) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळेस i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे **बंधनकारक** राहील

(५) संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच **प्रथम मान्यता** देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

(६) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले **माध्यम**, शाळेचे **ठिकाण** इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी **आपोआपच रद्द** समजण्यात येईल.

(७) **यु-डायस डाटा:-** या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या **नवीन शाळा / दर्जावाढ शाळा** बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना,"*स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा*" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी **राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई** यांना **नोडल अधिकारी** म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता "**स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा**" असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

३. सदर आदेश संबधित संस्थेस १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(रा.ग.गुंजाळ)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
३. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे
६. शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद (प्राथमिक / माध्यमिक), पुणे
७. निवडनस्ती (एसएम-२)